# बृहन्मुंबई महानगरपालिका

घ.क.व्य. खाते, जी/दक्षिण विभाग, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, प्रभादेवी, मुंबई – 400 013.

**<u>क्र.सहा.अभि.(घ.क.व्य.)/जी.द./455 / दिनांक :- 11.06.2026</u>**

**<u>"स्वारस्य अभिव्यक्ती" (E.O.I.)</u>**

<u>अशासकीय संस्थांमार्फत कामगार पुरवठा करण्यासंबंधी सूचना</u>

सदर सूचनेव्दारे जी/दक्षिण विभागातील सर्व नोंदणीकृत अशासकीय संस्थांना कळविण्यात येत आहे की, **जी/दक्षिण विभागातील मल निसारण चौक्या मध्ये रिक्त असलेल्या कामगारांच्या पदि विभागातीलदैनंदिनमल: निसारणखात्याशी संबंधित कामे करण्याकरिता मागणी नुसार कंत्राटी कामगार पुरविण्यासाठीस्वारस्य अभिव्यतीद्वारे नोंदणीकृत असशासकीय संस्थांची नेमणूक करण्याबाबत** खालिल अटी व शर्तीनुसार ईच्छुक अशासकीय संस्थांनी सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग, दुसरा मजला, जी/दक्षिण विभाग कार्यालय, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई – 400 013 यांच्या नावे नोंदणी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती सहीत **दि.17/06/2026**रोजी **दु.01:00**वाजेपर्यंत अर्ज करावेत. सदर तारखेनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही. अधिक माहितीसाठी सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग यांच्याशी कार्यालयीन वेळेत (साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टी वगळता)संपर्क साधावा.

<u>अटी व शर्ती :-</u>

1. जी/दक्षिण विभागातील नोंदणीकृत असलेल्या संस्थांनीच त्यांच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणी असलेल्या वेंडर कोड व ई-मेल आय-डी सहीत विषयांकीत काम मिळण्याकरीता अर्ज करावेत.
2. उपरोक्त विषयांकीत कामासाठी सोडत प्रक्रियेव्दारे आवश्यक 02 संस्थांचीनेमणुक करण्यात येईल.
3. आठ तासांच्या पाळीमध्ये संस्थांनी नेमून दिलेल्या ठिकाणी आवश्यकते व सूचनेनुसार कामगारांचा पुरवठा करुन संबंधित कनिष्ठ अवेक्षक यांना दैनंदिन कामाचा अहवाल छायाचित्रासहीत (timestamp app व्दारे) देणे बंधनकारक राहील.
4. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सद्य प्रचलित किमान वेतन धोरणानुसार वेतनाचे अधिदान रु.792.30प्रतिदिन / प्रति कामगार (लेव्ही वगळून) इतके राहील.
5. कामासाठी लागणारे आवश्यक साहित्य, अवजारेतसेच कामगारांस आवश्यक सुरक्षा उपकरणे/साधने पुरविण्यास संस्था बंधनकारक राहील.
6. विषयांकीत कामाच्या अर्ज छाननीशुल्करु.3993/- अधिक 18% वस्तु व सेवा कर (GST) असे एकुण रु.719 /- (ना-परतावा) म.न.पा. च्या नागरी सुविधा केंद्र येथे भरण्यात यावे.
7. अर्ज छाननी शुल्क भरणा चलन दि.16/06/2026ते दि.17/06/2026रोजी सकाळी 11:00 ते सायं.05:30 वाजेपर्यंत (साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टी वगळता) कार्यालयामार्फत देण्यात येईल. सदर वेळेनंतर आलेल्या संस्थांना अर्ज छाननी शुल्क भरणा चलन देण्यात येणार नाही.
8. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.17/06/2026रोजी दु.01:00 वाजेपर्यंतच असून त्यानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
9. विषयांकीत कामाच्या कालावधीदरम्याननियुक्तसंस्थेमुळेजी/दक्षिणविभागाचीप्रतिमामलीनहोतअसल्याससदरसंस्थेचे नाव पुढील 3 वर्षांसाठीकाळयायादीतटाकण्या संदर्भात प्रस्ताविण्यात येईल तसेच सदरसंस्थेलानेमूनदिलेलेकामकाढूनघेऊनतेकामप्रतिक्षायादीतनिवडण्यातआलेल्यासंस्थेसदेण्यात येईल.
10. अयोग्य अर्ज कोणताही पत्र व्यवहार न करता फेटाळण्याचे तसेच विषायांकीतकामाचाकालावधीतथाप्रस्तावितविसर्जनस्थळाचेठिकाणवत्याठिकाणीलागणारीमनुष्यबळाचीसंख्याहीपरिस्थितीनुसारकमी-अधिकतथास्थगितकरण्याचा अधिकारमा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग ह्यांचे राहतील.

सही/-

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण